# निवेदन

## राष्ट्रीय कार्यशाळा: लघुमत्स्योद्योग मार्गदर्शक सूचना व मत्स्योद्योगातील महिला, भारत

आम्ही, खाऱ्या व गोड्या पाण्यात काम करणाऱ्या विविध महिला मत्स्यकामगार संघटनांच्या प्रतिनिधी (संस्था, सहकारीसंस्था, कामगार संघटना, बचत गट ), तसेच पश्चिम बंगाल, तामीळनाडू, महाराष्ट्र, गोवा, केरळ येथील मत्स्यसमुदायातील महिला, तसेच प्रामुख्याने, किनाऱ्या नजीकच्या पाण्यामधून समुद्री शेवाळ व कवची मासे गोळा करणे, मासे सुकवणे व त्यावर प्रक्रिया करणे तसेच रस्त्यावर व घरोघरी जाऊन मत्स्यविक्री करणे या कामांमधून आपली उपजीविका मिळविण्याऱ्या महिला आहोत.

आशा निवास, चेन्नई, तामीळनाडू येथे दि. ८ ते १० एप्रिल २०२२ रोजी *राष्ट्रीय कार्यशाळा: लघुमत्स्योद्योग मार्गदर्शक सूचना व मत्स्योद्योगातील महिला, भारत* या देशभरातील महिला मत्स्यकामगारांच्या व्यासपीठाद्वारे, मत्स्योद्योगातील महिलांच्या भूमिकेची दृश्यता वाढविणे व त्यांना त्यांचे हक्क मिळवून देणे, मत्स्योद्योगातील मूल्य-साखळीमध्ये त्यांच्या उपजीविकेचे अवकाश अधिक विस्तारणे व सरकारकडून त्यांची योग्य ती दखल घेतली जावी, याकरिता एकत्र भेटलो होतो.

कोविड – १९ च्या महामारीचा आमच्या जीवनावर व उपजीविकेवर झालेला परिणाम व सहाय्य व पुनर्वसनाकरिता केलेल्या उपाययोजनांची परिणामकारकता याचा आढावा घेतला.

मासेमारी व मासेविक्री या आमच्या कामांवर औद्योगिक प्रदूषण व हवामानातील अतिरेकी बदल यामुळे होणाऱ्या विपरीत परिणामांविषयी आम्हाला वाटणारी चिंता व्यक्त केली.

किनारपट्टीची धूप, अति-मासेमारी, महामारी व अन्य नैसर्गिक आपत्ती यांचे विपरीत परिणाम मत्स्यसमुदायातील महिलांना प्रमाणापेक्षा अधिक भोगावे लागतात याची दखल घेतली.

तसेच मत्स्योद्योगातील मूल्य-साखळीमधील महिलांच्या कामांची कायम राहिलेली अदृश्यता, विशेषत: मासे गोळा करणाऱ्या महिलांचे काम व अन्न सुरक्षेमधील तसेच स्थानिक पोषणमुल्य वाढविण्यामधील त्यांचे योगदान याकडे झालेले दुर्लक्ष यावर विशेष चर्चा केली.

केंद्रीय, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्थांचे आमच्या व मत्स्यकामगार संघटनांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधू इच्छितो:

१. समुद्री, किनारी व अंतःक्षेत्रा मधील जीवसृष्टी चे संरक्षण व त्यानजीकच्या भूमीची उपलब्धता अबाधित राखणे, मत्स्यव्यावसायिक समुदायांचे जीवन व उपजीविका सुरक्षित ठेवणे; या संदर्भात सर्व प्रकारचे जलप्रदूषण रोखणे, तेलगळती, वाहतूक, वाळू उपसा, प्लॅस्टिक कचरा, गटारे, औद्योगिक कचरा, इ. व यासारखे अन्य प्रदूषण रोखणे.

२. केंद्रीय व राज्य पातळीवरील सर्व मत्स्योद्योगविषयक धोरणे, कायदे व योजनांमध्ये महिलांना विशेष प्राधान्य देणे. राज्य मत्स्योद्योग विभागाने राज्य पातळीवर महिला मत्स्यकामगारांकरिता उपलब्ध असलेल्या सर्व योजनांची माहिती एकत्रित करणे व त्याचाा प्रसार करणे. मत्स्योद्योगातील सर्व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ महिला व पुरुष या दोघांनाही मिळवून देणे, विशेषतः महिला-प्रमुख असलेल्या कुटुंबांना; या संदर्भात सर्व महिला मच्छिमार व मत्स्यकामगारांची नोंदणी करून त्यांना परवाने देणे, व त्यांचा एक माहितीसंग्रह (डेटाबेस) तयार करणे, ज्यामध्ये कवची गोळा करणाऱ्या व पकडणाऱ्या महिला देखील समाविष्ट असतील.

३. महिला व बालविकास विभाग तसेच समाजविकास विभागांमध्ये मत्स्योद्योगातील महिलांचा सहभाग वाढविणे ज्यायोगे खास महिला मच्छिमार व मत्स्यकामगार यांना लाभ मिळेल अशा योजना विकसित केल्या जातील.

४. विविध पातळ्यांवरील मच्छिमार व मत्स्यकामगार यांच्या व्यापक सल्लामसलतीतून व सहभागातून लघुमत्स्योद्योगाकरिता राष्ट्रीय मार्गदर्शक सूचना व मत्स्योद्योगातील महिलांकरीता राष्ट्रीय धोरण निर्माण करणे.

५. समुद्र व नदीकिनारच्या कोणत्याही क्षेत्रांशी संबंधित धोरणे ठरविताना पारंपारिक मत्स्यव्यावसायिक समुदायांचे जीवन व उपजीविका यांचे संरक्षण करणे, व हे करताना संबंधित समुदायांचा, विशेषत: महिलांचा, सहभाग घेणे.

६. वस्ती व गृहनिर्माण संबंधित स्थानिक कायदे, तसेच पर्यावरण, मत्स्योद्योग, जंगल व जंगली जनावरे यांच्याशी संबंधित कोणतेही कायदेशीर दस्तावेज यामध्ये मत्स्यव्यावसायिक समुदायांचे मच्छीमारी/जमीनवापर करण्याचे पारंपारिक हक्क यांची दखल घेऊन त्यांचा योग्य तो आदर करणे.

७. मासेमारीची साधने व पद्धती यामध्ये बारीक जाळी व एलईडी लाईट यांचा वापर रोखणे, तसेच घातक मच्छीमारीवर नियंत्रण ठेवणे ज्यायोगे सध्याच्या तसेच पुढील पिढ्यांकरितादेखील मत्स्यसंसाधने टिकून राहू शकतील.

८. सागरी व किनारपट्टी संवर्धन व उपजीविकेकरिता मासेमारी करणारे पारंपारिक लघुमत्स्योद्योग समुदाय यांच्यातील संघर्ष मिटविणे. या संदर्भात आदिवासी व जंगलांमध्ये राहणारे समुदाय यांचे हितसंबंध जपणारा जंगलहक्क कायदा, २००६, याची अंमलबजावणी करणे.

९. समुद्रातील, किनारपट्टीवरील किंवा नदीकिनाऱ्यांवरील कोणतेही संशोधनात्मक, शोषणात्मक किंवा विकासात्मक प्रकल्प हाती घेण्यापूर्वी मत्स्योद्योग समुदायांची माहितीपूर्ण मान्यता घेणे; महिला-प्रमुख कुटुंबांना व महिला मच्छिमार व मत्स्यकामगारांना देखील त्यांच्या उपजीविकांचा व हितसंबंधांचा विचार करून योग्य ती भरपाई देणे.

१०. महिला मच्छिमार व मत्स्यकामगारांच्या प्रतिनिधींशी चर्चा करून स्थानिक स्वराज्य संस्थांनी चालविलेल्या बाजारांमधील सोयी सुविधा सुधारणे, ज्यामध्ये पाणी, वीज, स्वच्छतागृहे व महिलांची छळवणूक होण्यापासून संरक्षण करणाऱ्या सुविधा उपलब्ध असतील; बाजाराचे व्यवस्थापन करण्यामध्ये महिलांचा समावेश करून घेणे, तसेच मासे साठवणूक/प्रक्रिया करण्याकरिता किफायतशीर व कर्बोत्सर्जन कमी असलेले तंत्रज्ञान व साधने विकसित करणे

११. मत्स्यविक्री करणाऱ्या महिलांचे बाजाराच्या जागांवरील हक्क सुरक्षित करणे, तसेच बाजाराची पुनर्रचना करताना त्यांच्या प्रतिनिधींचे मत विचारात घेणे

१२. रस्त्यावर मत्स्यविक्री करणाऱ्या महिलांकरिता जागा सुरक्षित करणे व रस्त्यावरील विक्रेते (रस्त्यावरील विक्री नियंत्रण व उपजीविका संरक्षण कायदा) २०१४, ची अंमलबजावणी करणे.

१३. महिला मत्स्यविक्रेत्या बाजारापर्यंत पोहोचू शकतील अशा किफायतशीर दराच्या सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध करून देणे

१४. मत्स्योद्योगातील लागू असलेल्या योजना व सामाजिक सुरक्षा योजनांकरिता अंदाजपत्रकात करण्यात येणारी आर्थिक तरतूद ही महिला मच्छिमार व मत्स्यकामगारांच्या गरजांशी सुसंगत असेल व त्यांचे वाटप योग्य त्या कालावधीमध्ये केले जाईल याची खातरजमा करणे. या संदर्भात महिला मच्छिमार व मत्स्यकामगारांचा सामाजिक सुरक्षेचे लाभ मिळण्याचा हक्क प्रत्यक्षात येऊ शकेल याकरिता प्रक्रियेतील त्रुटी दूर करणे व सुधारणे.

१५. शैक्षणिक लाभ, वृद्धत्वाचे लाभ, संकटमुक्तीचे लाभ, हंगामी बंदीचे लाभ, पर्यावरण बदल किंवा प्रदूषणामुळे उपजीविकेवर होणाऱ्या विपरीत परिणामांच्या भरपाईचे लाभ यासारखे सर्व सामाजिक सुरक्षेचे लाभ महिला मच्छिमार व मत्स्यकामगारांपर्यंत तसेच महिला-प्रमुख कुटुंबांपर्यंत पोहोचतील याकरिता पावले उचलणे.

१६. महामारी सह अन्य नैसर्गिक आपत्तींकरिता मत्स्योद्योगास द्यावायच्या भरपाईचे स्वरूप ठरविताना त्या क्षेत्रातील महिलांचे मत विचारात घेणे

१७. सामाजिक विकास कार्यक्रम आखताना व अंदाजपत्रकातील तरतुदी करताना महिलांच्या सहभागास प्रोत्साहन दिले जाईल या दृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थांची क्षमताबांधणी करणे.

१८. एकंदर राष्ट्रीय मत्स्य-उत्पादनाची मोजणी करताना महिला पकडत किंवा गोळा करीत असलेल्या सर्व मत्स्य – उत्पादनांचा त्यामध्ये योग्य प्रकारे समावेश करणे; या संदर्भात माहिती संकलन करण्याकरिता विकेन्द्रित पद्धत वापरणे, व यामध्ये हाताने गोळा केल्या जाणाऱ्या कवची व अन्य मत्स्यप्रकारांचाही समावेश करून घेणे.

१९. मच्छिमार संघटना व पारंपारिक मत्स्यव्यावसायिकांच्या समुदायस्थित संस्थांना, निर्णयप्रक्रियेमध्ये महिला मच्छिमार व मत्स्यकामगारांचा प्रभावी सहभाग असावा याकरिता विशेष प्रयत्न करण्यास सांगणे.

आंतरराष्ट्रीय पारंपारिक व जलजीवसंवर्धन वर्ष – २०२२ च्या निमित्ताने महिला मत्स्यकामगार व मत्स्यव्यावसायिक समुदायांतील आम्ही सर्व महिला प्रतिनिधी, वरील कृती-मुद्यांची अंमलबाजवणी, अन्न-सुरक्षा व दारिद्र्य निर्मुलनाच्या संदर्भात शाश्वत

लघुमत्स्योद्योगांच्या संरक्षणासाठी असलेल्या ऐच्छिक मार्गदर्शक तत्वांशी सुसंगत अशा पद्धतीने केली जावी, असे आवाहन करीत आहोत.

कार्यशाळेविषयी अधिक माहितीकरिता कृपया येथे पहावे: ***https://www.icsf.net/resources/india-national-workshop-the-ssf-guidelines-and-the-platform-for-women-in-fisheries/***